# शिक्षण सम्राटांमुळे महाराष्ट्रात शिक्षण खाते सांभाळणे अवघड!

## मनोहर पर्रिकर यांची टिप्पणी

प्रतिनिधी, पुणे

'शिक्षण हा माझ्या आवडीचा विभाग होता. मी मुख्यमंत्री असताना ते खाते माझ्याकडेच होते. मात्र, महाराष्ट्रात शिक्षण सम्राट जास्त असल्यामुळे शिक्षण खाते सांभाळणे सोपे नाही,' अशी टिप्पणी संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांनी गुरुवारी केली.

समदा प्रकाशनतर्फे 'माझ्या गोव्याच्या भूमीत' आणि 'शाळेतील दिवस' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्यात पर्रिकर बोलत होते. या वेळी राज्याचे सांस्कृतिक व शिक्षणमंत्री विनोद तावडे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष माधवी वैद्य, बुकगंगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, समदा प्रकाशनाच्या मनस्विनी प्रभुणे उपस्थित होते.

पर्रिकर यांनी या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता ते गोव्याचे मुख्यमंत्री आणि आता देशाचे संरक्षण मंत्री हा प्रवास उलगडला. ते म्हणाले, 'आपल्याकडे राजकारणात येण्यासाठी एखाद्या जातीचा किंवा धर्माचा पाठिंबा लागतो. मात्र, असे काहीही नसताना मी राजकारणात आलो. सुरुवातीला दहा वर्षेच राजकारणात राहायचे असे ठरवले होते. मात्र, आता तेवीस वर्षे राजकारणात आहे. मी पहिल्यावेळी मुख्यमंत्री झालो, तेव्हा शिक्षण आणि अर्थ खाते मी माझ्याकडेच ठेवले होते. शिक्षण खाते राज्याच्या पुढील विकासाची आणि बदलांची दिशा ठरवत असते. मला आवडते म्हणून मी शिक्षण खाते घेतले होते. मात्र, हा फार जटिल असा विभाग आहे. त्यात महाराष्ट्रात शिक्षण सम्राट असल्यामुळे शिक्षण विभाग सांभाळणे सोपे नाही.' या वेळी 'मला गोव्यातच अधिक आवडते,' असेही पर्रिकर यांनी सांगितले.



समदा प्रकाशनतर्फे 'माझ्या गोव्याच्या भूमीत' आणि 'शाळेतील दिवस' या पुस्तकांचे प्रकाशन गुरुवारी करण्यात आले. या वेळी मंदार जोगळेकर, विनोद तावडे, मनोहर पर्रिकर, मनस्विनी प्रभुणे, माधवी वैद्य उपस्थित होते.

शिक्षणातील स्पर्धा वाढली असून सध्या विद्यार्थी हे रेसमधल्या घोड्यांसारखे झाले आहेत, असे विधान करून तावडे म्हणाले, 'शिक्षणाची मोठी बाजारपेठ उभी राहिली आहे. मागणी तसा पुरवठा करणाऱ्या शाळा आहेत. जे शिक्षणात गुंतवणूक करतात, ते जाहिरातबाजीसाठीही मोठी गुंतवणूक करत आहेत. मात्र, या सगळ्यात विद्यार्थ्यांना मिळणारी शिक्षणाची, शाळेची गंमत हरवत चालली आहे. सध्या विद्यार्थ्यांना पुढे जाऊन आठवावेत असे शाळेतील दिवस मिळवून देणे हेच मोठे आव्हान आहे.'